# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



०५/१०/२०१५

---

**भव्य, उत्कट, प्रांजळ**

डॉ. उषा प्रबोधिनी, पुणे खिरे, ज्ञान

****************************************************************************************************

१९६३ साली पुणे विद्यापीठात मी एम्. ए. करीत होते. मानसशास्त्र विभागातील प्राध्यापकांमध्ये, वेगळ्या पोशाखातील उंच, रुबाबदारपणे चालणारी, कमरेवर हात ठेवून एका विशिष्ट शैलीत बोलणारी एक व्यक्ती लक्ष वेधून घेई. वाटायचं की हे व्यक्तिमत्व काही केवळ प्राध्यापकाचं नाही. या भव्य व्यक्तिमत्वाला ती छोटीशी लँब्रेटाही शोभत नाही.दुसरं काहीतरी वाहन हवं.

मग ही व्यक्ती म्हणजे डॉ. वि. वि.पेंडसे – आप्पासाहेब पेंडसे आहेत असे कळले. ते आम्हाला शैक्षणिक मानसशास्त्र शिकवीत. शिकवता –शिकवताच चिंतन करीत. दूरवरचा विचार करीत. भारतीय आणि पाश्चात्य शिक्षण विचाराची तुलना करीत.

मला माझ्या अडचणींमुळे नेहमी तासांना उपस्थित राहाता येत नसे. एक दिवस त्यांनी मला बोलावून घेतलं. मला जरा धास्तीच होती. ‘तासाला का येत नाही?’ अशी विचारणा होईल म्हणून. पण ते अगदी सौम्यपणे, प्रसन्नपणे बोलले. ‘तुम्ही पीएच्. डी. करा. तुम्हाला खात्रीने जमेल.’ असे धीराचे, प्रोत्साहनाचे शब्द ऐकायला मिळाले, मन उल्हसित झालं. हळूहळू त्यांना ‘आप्पा’ म्हणण्याइतका मोकळेपणा वाटू लागला.

माझा धाकटा भाऊ अनिल याच्यावर आप्पांचा खूप लोभ. माझ्या मुलांना-रजू-हेमंताला एकदा विद्यापीठात घेऊन यावं असं आप्पांनी मला सुचवलं. मुलं आली तेव्हा त्यांचं कौतुक केलं- ‘मोठ्ठे मोठ्ठे डोळे आहेत तुमच्या मुलांचे!’

**डाळ पाखडणारे आप्पा!**

एक दिवस मी सकाळी आप्पांकडे गेले तर घरातल्या पोशाखात हातात सूप घेऊन तुरीची डाळ पाखडत असलेले दिसले ! मी गांगरून गेले. तो घरगुतीपणा आवडलाही. त्यांच्याकडे काम करणाऱ्या काकाजींनी केलेली गरम धिरडी खायची, कॉफी प्यायची हे नेहमीचंच आतिथ्य होतं.

आप्पा म्हणतील ते प्रमाण ! असा त्यांचा आग्रह असे – असा काहींचा अनुभव होता. कदाचित काही बाबतीत ते खरंही असेल. पण मला मात्र वेगळा अनुभव आहे. मी प्रबोधिनीच्या मानसशास्त्र विभागात काम करत आहे तेव्हापासून संशोधनात, प्रशासनात, आर्थिक व्यवहारात इतरत्र कुठेही नसतं येवढं स्वातंत्र्य प्रबोधिनीत असल्याचा माझा अनुभव आहे.

चुकांबद्दल आप्पा रागावत. तिखट बोलत. त्याचं मला दुख: होई. पण त्यांच्यावरचे अनंत प्रकारचे ताण, त्यांच्या आकांक्षा, त्यातून होणारी ओढाताण यामुळे त्यांची चिडचीड होत असे हे मला समजत होतं.

मुळात हा माणूस अकृत्रिम, भावसंपन्न वृत्तीचा, अपरंपार जिव्हाळा, ओलावा पोटी असलेला, स्वत: बरोबर इतरांनाही दूरचं पाहायला लावणारा, मोठी झेप घेण्याचा आग्रह धरणारा, हातून झालेल्या चुकांविषयी प्रांजळपणे बोलणारा असा होता.

त्यांच्या सहवासात काही शिकणं झालं. आता त्यांच्या स्मृतीतून अजून पुष्कळ समजावून घ्यायचं आहे, शिकायचं आहे.

---